# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २७/०३/२०२६

**प्रभाग समिती क्र. २ भाईंदर (प.)**
**विशेष सभा सुचना क्रमांक १**

**प्रति,**
**श्री./श्रीमती ----------------------------------------------**
**सदस्य/सदस्या, प्रभाग समिती क्र. २**
**भाईंदर (प.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची प्रभाग समिती क्र. २ ची विशेष सभा मंगळवार दि. ०७/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, स्व. लाल बहादुर शास्त्री सभागृहात सभा सुचना क्र. १ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सदर सभेस कृपया उपस्थित रहावे हि विनंती.

**मा. पिठासीन अधिकारी यांच्या मान्यतेने.**

**(दिनेश कैलास कानगुडे)**
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

---

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रभाग समिती क्र. २ विशेष सभा दि. ०७/०४/२०२६ सुचना क्रमांक १**
**विषयपत्रिका**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| १ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, प्रकरण २, कलम २९अ(४) अन्वये सन २०२६-२७ या कालावधीकरिता (दि. ३१ मार्च २०२७ पर्यंत) प्रभाग समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची "सभापती" प्रभाग समिती या पदावर नेमणूक करणे. |

**(दिनेश कैलास कानगुडे)**
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सोबत :- १) निवडणूक कार्यक्रम.**
**२) नामनिर्देशन पत्र नमुना एक.**
**३) प्रभाग समिती सदस्यांची यादी.**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मंगळवार दिनांक ०७/०४/२०२६ रोजी होणाऱ्या प्रभाग समिती क्र. २ भाईंदर (प.) सभापती निवडणूक कार्यक्रम.**

| वार / दिनांक | तपशिल |
|---|---|
| गुरुवार<br>दि. ०२ एप्रिल, २०२६<br>(दुपारी ३.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत) | सन २०२६-२७ कालावधीकरीता (३१ मार्च २०२७ पर्यंत) प्रभाग समिती क्र.२ सभापती पदाचे नेमणुकीकरीता नामनिर्देशनपत्र विहित नमुन्यात महापालिका सचिवांकडे कार्यालयीन वेळेत दाखल करणे. |
| मंगळवार<br>दि. ०७ एप्रिल, २०२६<br>(सकाळी ११.०० वाजले नंतर) | प्रत्यक्ष सभेचे कामकाज सुरु झाल्यावर ...<br>१. बोलविलेल्या विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर हे असतील.<br>२. सभापती प्रभाग समिती क्र.२ पदासाठी प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी व उमेदवारी मागे घेणे.<br>३. कोणत्याही उमेदवारास पुर्ववर्ती पोटनियमान्वये यथोचितरित्या नामनिर्देशित पालिका सदस्यांचे नाव वाचून दाखविल्यानंतर १५मिनिटांच्या आत त्याने सही केलेली लेखी नोटीस मा. पिठासीन अधिकाऱ्यांकडे देऊन त्याची उमेदवारी मागे घेता येईल.<br>४. मा. पिठासिन अधिकारी आपली उमेदवारी मागे घेतलेल्या उमेदवारांची नांवे संबंधित प्रभाग समिती सदस्यांस वाचून दाखवतील.<br>५. सभापती प्रभाग समिती क्र.२ पदाचे निवडणूकीसाठी आवश्यकता भासल्यास मतांची नोंद हात वर करुन घेण्यात येईल.<br>६. निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या घोषित केल्यानंतर मा. पिठासीन अधिकारी निकाल घोषीत करण्याची कार्यवाही करतील. तद्नंतर उमेदवारांनी मिळविलेल्या मतांच्या संख्येनुसार चढत्याक्रमाने उमेदवाराची यादी तयार करतील. ज्या उमेदवाराला मतदानात जास्त मते पडतील तो उमेदवार रितसर निवडून आल्याची घोषणा करण्यांत येईल.<br>७. मते समसमान मिळाल्यास मा. पिठासीन अधिकारी असे घोषीत करतील की, निवडणूकीचा निकाल चिठ्ठ्या टाकून सोडतीद्वारे सोडविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले प्रभाग समिती सदस्य बहुसंख्येने ठरवतील अशा व्यक्तींकडून चिठ्ठी काढण्यात येईल.<br>८. ज्या उमेदवाराच्या नावाने चिठ्ठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैधरितीने निवडून आला असल्याचे मा. पिठासीन अधिकारी घोषीत करतील. |

(दिनेश कैलास कानगुडे)
**महापालिका सचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**सचिव कार्यालय,**
**तिसरा मजला, मुख्य कार्यालय,**
**स्व. इंदिरा गांधी भवन,**
**छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)**
**दिनांक :- २७/०३/२०२६**

# मिरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर
## नामनिर्देशन पत्र
### नमुना एक
(नियम ३ (१) पहा)

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.२ भाईंदर (प.) सभापती पदासाठी निवडणूक

मिरा - भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प)

मी, याद्वारे ---------------------------------------------------------------------- यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.२ भाईंदर (प.) च्या सभापतीपदी निवडणूकीकरिता सभापती म्हणून नामनिर्देशित करित आहे.

उमेदवाराचे पूर्ण नांव :- ----------------------------------------------------------------

उमेदवाराचा टपालाचा संपूर्ण पत्ता :- ----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

उमेदवार हा नगरसेवक म्हणून जेथून निवडून आला त्या प्रभागाचा क्रमांक / जागा क्रमांक :- ----------------------------------------------------------------

सुचकाचे पूर्ण नांव :- ----------------------------------------------------------------

(सुचकाची सही)

अनुमोदकाचे पूर्ण नांव :- ----------------------------------------------------------------

दिनांक :- /०४/२०२६ (अनुमोदकाची सही)

---

उमेदवाराचे प्रतिज्ञापत्र

मी, याद्वारे या नामनिर्देशनाला अनुमती देत आहे आणि माझी निवड झाल्यास, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.२ भाईंदर (प.) चा सभापती म्हणून कार्य करण्याची तयारी दर्शवित आहे.

दिनांक :- /०४/२०२६ (उमेदवाराची सही)

---

(नामनिर्देशनपत्रे स्विकारण्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याने भरावयाचे)

* सुचकाने /उमेदवाराने दाखल केलेल्या, नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक .......... (वेळ) दुपारी / सायंकाळी .......... वाजता, दिनांक :- /०४/२०२६

दिनांक :- /०४/२०२६ (अधिकाऱ्याची सही)

* जे लागू नसेल ते खोडावे.

कृपया मागे पहा

मिरा - भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय
भाईंदर (प)

## विशेष माहिती :-

१. प्रभाग समिती क्र.२ भाईंदर (प.) सभापती पदासाठी निवडणूक लढविण्याची इच्छा असलेला प्रभाग समिती क्र. २ चा कोणताही सदस्य पालिका सचिवांकडे नामनिर्देशन जातीने सादर करतील

२. नामनिर्देशन पत्रात उमेदवाराचे पुर्ण नाव नमुद केलेले असेल आणि त्यावर एका प्रभाग समिती क्र. २ भाईंदर (प.) सदस्याने सुचक म्हणून व दुसऱ्याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केलेली असेल.

३. कोणताही प्रभाग समिती क्र. २ भाईंदर (प.) सदस्य एकापेक्षा अधिक उमेदवाराची नामनिर्देशने सुचित करणार नाही किंवा त्यास अनुमोदन देणार नाही.

४. सभापती नियुक्ती करण्याकरिता सुचक किंवा अनुमोदक असणाऱ्या सदस्यास सभापती पदासाठी निवडणूक लढविता येणार नाही.

५. सुचक व अनुमोदकाने दिलेल्या जागी स्वत:चे संपूर्ण नांव लिहिले पाहिजे व तो प्रभाग समिती क्र. २ भाईंदर (प.) चा सदस्य असला पाहिजे.

६. कोणत्याही उमेदवाराला एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे सादर करण्यास प्रतिबंध केला जाणार नाही. परंतु असे की, कोणत्याही उमेदवाराकडून किंवा त्यांच्यावतीने चार पेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे सादर करण्यात येणार नाहीत.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## प्रभाग समिती क्र. २
## भाईंदर (प.)

मिरा - भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय
भाईंदर (प)

| अ.क्र. | जागा क्र. | सदस्याचे नांव | पक्षाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | १अ | शर्मा मानशी रमेश | भारतीय जनता पार्टी |
| २ | १ब | ॲड. श्रध्दा संदिप कदम | भारतीय जनता पार्टी |
| ३ | १क | तिवारी अशोक सुर्यदेव | भारतीय जनता पार्टी |
| ४ | १ड | पंकज पांडेय (दरोगा) | भारतीय जनता पार्टी |
| ५ | ६अ | मेबल नोएल कोरीया | भारतीय जनता पार्टी |
| ६ | ६ब | जैन सुनिता रमेश | भारतीय जनता पार्टी |
| ७ | ६क | परेश जयंतीलाल शाह | भारतीय जनता पार्टी |
| ८ | ६ड | कोठारी भरतकुमार नथमलजी | भारतीय जनता पार्टी |
| ९ | ७अ | ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | भारतीय जनता पार्टी |
| १० | ७ब | डॉ. भव्या पिपलिया (शाह) | भारतीय जनता पार्टी |
| ११ | ७क | आभा अमेय पाटील | भारतीय जनता पार्टी |
| १२ | ७ड | ॲड. रवि व्यास | भारतीय जनता पार्टी |

| अ.क्र. | पक्षाचे नांव | एकूण सदस्य |
|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | १२ |
| | **एकूण** | **१२** |